Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P011
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय ज्ञान परंपरा आणि गावगाड्यातील बलुतेदारी व्यवस्था

**आम्रपाली कांबळे**
Ph.D Scholar
Department of sociology
RTMNU NAGPUR UNIVERSITY
amrapalibhivara@gmail.com

**सारांश**
गावगाडा आणि भारतीय ज्ञान परंपरा याचा संबंध गावोगावी टिकून असलेल्या पारंपारिक ज्ञान प्रणाली मध्ये आहे. गावगाडा हे भारतीय ज्ञान परंपरेचे एक महत्त्वाची अंग आहे कारण गावाची रचना आणि जीवन पद्धती ह्या ज्ञानपरंपरेच्या मूल्यावर आधारित आहेत. गावाची पारंपारिक व्यवस्था समजून घेतांना, पूर्वीच्या काळी आपल्या समाजात बारा बलुतेदारी पद्धत अस्तित्वात होती. शेतकरी हा शेती करायचा पण त्याच्या इतर गरजा भागवण्यासाठी आणि वस्तूची देवाण-घेवाण करण्यासाठी एक सिस्टीम काम करायची तिला बोलूतेदारी म्हणत,हे बलुतेदार गावचे वतनदार असत. पिढ्यानपिढ्या तेच गावचे ठराविक काम करत असत. गाव गाड्याच्या ह्याच व्यवस्थेला समजून घेण्याकरिता गावगाडा व त्याची संरचना समजून घेण्याकरिता गावात कधी काळी अस्तित्वात असणारी गावाची पारंपारिक व्यवस्था समजून घेणे तितकीच महत्त्वाची आहे. गावगाडा ही एका बाजूला शेती व्यवस्थेतील उत्पादन प्रक्रिया सांभाळणारी व्यवस्था होती तर दुसऱ्या बाजूला तिला जातीय संबंध व उतरंड सांभाळणाऱ्या व्यवस्थेचे स्वरूप येत गेले .जातीला गावगाड्यात विशिष्ट भूमिका व विशिष्ट कामे होते व ते वंशपरंपरागत होते. जात ही जन्मजात व जाते आधारित व्यवसाय असल्याने व्यवसाय व कामही जन्मजात होते.आपल्या जातीपलीकडे काम करण्याची मुभा नव्हती. हा ढाचा मोठ्या प्रमाणात पिढ्यानेपिढ्या टिकून राहण्याचे कारण त्यांना बांधून ठेवणारे सांस्कृतिक व धार्मिक बंधन होय.गावातल्या देवस्थानाची जोडलेले पारंपरिक मान आणि त्याची धार्मिक व्यवस्था ही त्याचा आधार होती. नुसते व्यवसाय इतका प्रदीर्घ काळ जातीनिहान टिकवणे कठीण होते .आजही व्यवसाय आधारित गावगाडा कोसळला असला तरी अनेक गावात त्याची देवस्थानाची जोडलेली आखणी आणि मानकरांनी व्यवस्था बऱ्यापैकी टिकून आहे. गावगाडा हे चाक होते या चाकाच्या आऱ्या प्रत्येक भाग बांधला होता कोणी सुटले नव्हते. हा लेख महाराष्ट्रात मधील वर्धा जिल्ह्यातील एका गावातील व्यक्तीगत अध्ययन करून प्राथमिक माहिती एकत्रित करत, गाव गाड्यातील संरचना समजून घेण्याचा प्रयत्न या लेखाच्या माध्यमांतून केला.
**बीज शब्द:** वतनदार, बलुतेदार , सामाजिक व्यवस्था, धार्मिक व्यवस्था, मानपान,वर्ण व्यवस्था,जात व्यवस्था, जातीय उतरंड, बलुत इत्यादी

## प्रस्तावना

भारत हा आत्तापावेतो ग्रामीण देश आहे आणि गावगाडा या एका शब्दात सगळी प्राचीन भारतीय समाज व्यवस्था सामावलेली होती. गावगाडा आणि भारतीय ज्ञान परंपरा याचा संबंध गावोगावी टिकून असलेल्या पारंपारिक ज्ञान प्रणाली मध्ये आहे. या ज्ञानपरंपरा म्हणजे शेती, आरोग्य, कला ,स्थापत्यशास्त्र ,तत्त्वज्ञान आणि गणित यासारख्या क्षेत्रातील गावाच्या परिस्थितीतील ज्ञान व परंपरा शाश्वतता आणि निसर्गाशी सुसंवाद साधन्यावर भर देतात ,त्यामुळे गावकऱ्यांचे जीवन समृद्ध होते आणि नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन होते.ह्या सगळ्याच्या अनुषंगाने गावाची पारंपारिक व्यवस्था समजून घेणे तितकीच महत्त्वाची;सामाजिक आणि भौतिक रचना ,यात गावातील घरे जमीन शेती बाजारपेठ आणि सामुदायिक जागा यांचा समावेश होतो जी गावाच्या जीवनाचा गाभा असते. शेती आणि ग्रामीण जीवन,गावगाडा हा शेतीशी निगडित असतो. जिथे पीक पद्धती जल व्यवस्थापन आणि नैसर्गिक संसाधनाचा वापर हे महत्त्वाचे घटक असतात .जे भारतीय ज्ञान परंपरेचा भाग आहेत. सामुदायिक संबंध,गावातील लोकांचे परस्पर संबंध त्यांचे सण पारंपरिक खेळ आणि सामुदायिक उत्सव हे गाव गाड्याचे महत्त्वाचे पैलू आहेत. सर्वांगीण विकास आणि समग्र दृष्टिकोन, भारतीय ज्ञान परंपरा केवळ वैज्ञानिक किंवा तात्विक ज्ञानापूर्ती मर्यादित नाही ,तर त्यात अध्यात्मक ,कला, साहित्य ,नीतिमत्ता आणि निसर्गाशी असलेला सुसंवाद या सर्वांचा समावेश आहे. शाश्वतता, ही ज्ञान परंपरा निसर्गाच्या संवर्धनावर आणि शाश्वत विकासावर भर देते सेंद्रिय शेती, पीक फेरपालट आणि पावसांच्या पाण्याची साठवणूक यासारख्या पारंपारिक पद्धती यात येतात. गुरु शिष्य परंपरा, ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्यासाठी गुरु शिष्य परंपरा महत्त्वाची आहे. प्राचीन ग्रंथ, भारतीय ज्ञान संग्रह वेद उपनिषद आणि पुराणांमध्ये रुजलेला आहे आणि विविध संस्कृतीच्या योगदानातून विकसित झाला आहे.

थोडक्यात गावगाडा हे भारतीय ज्ञान परंपरेचे एक महत्त्वाची अंग आहे कारण गावाची रचना आणि जीवन पद्धती ह्या ज्ञानपरंपरेच्या मूल्यावर आधारित आहेत. ह्याच अनुषंगाने ,महाराष्ट्रात हा गावगाडा कसा होता कसा चालत होता ,त्याची विशिष्ट कोणती होती ,ते समजून घ्यायचे असेल तर अत्रे यांचा गाव गाडा समजून घ्यावा लागेल. पुराणांतरी गावाची व्याख्या अशी दिली आहे की, -

"तथाशूद्रजनप्राया सुसमृद्धकृषीवला /
क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिग्रामसंजिता //"

जिच्या भोवती कीर्दसारा - वहितीला योग्य - जमीन आहे, आणि जिच्यामध्ये मातबर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत, अशा वस्तीला गाव म्हणतात. गावाच्या हद्दीला किंवा सीमेला ' शीव' ही संज्ञा आहे. गावाचे स्वभावत: आणि एकमेकांपासून अलग

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

असे दोन भाग उघडउघड पडतात . एक ' पांढरी' किंवा गावठाण आणि दुसरा ' काळी' किंवा रान. काळी आणि पांढरी ह्या संज्ञा जमिनीच्या रंग व गुणधर्मावरून प्रचारात आल्या असाव्या.(गावगाडा १९१५)

**गावगाड्यांची रचना:**

खेड्यात अव्वल आणि प्रधान वस्ती कुणब्यांची.तेथे अडाण्याच्या साऱ्या द्वारकेची एक काय ती मेढ, आणि ती कुणबी होय . "धान्यानामष्टमो भाग : षष्ठी द्वादश एव वा आददित" इत्यादि मनस्मृती आहे, तरी राजाने रयतेच्या उत्पादनाचा सहावा हिस्सा भाग्यधेय (कर) म्हणून द्यावा, असा सरसकट धारा पडला असावा.

आत्रेने गावागाड्यात गावानुसार झालेली रचना सांगताना सांगतात की,

"स्पृश्य जातीची घरे वेशीच्या आत असतात आणि मेलेल्या जनावरांची चिरफाड करणाऱ्या (शस्त्राने न मारलेल्या म्हणजेच निसर्गधर्माने मेलेल्या जनावराला ' पेड' म्हणतात ; त्यांच्या मांसाला ते न खाणाऱ्या जाती ' माती' म्हणतात व ते खाणाऱ्या जाती 'भाजी' म्हणतात) व ती खाणाऱ्या जातीची; तसेच वंजारे , वड्डर, कैकाडी, फासपारधी वगैरेसारख्या फिरस्त्या व नवीन वस्तीला आलेल्या जंगली जातीची घरे, पाले किंवा झोपड्या प्राय: गावाबाहेर असतात."

"अस्पृश्य जाती पैकी ज्या गोमास खात नाही अशा ढोर चांभार भंगी इत्यादीची घरे गावात शेवटी किंवा गावकुसाबाहेर अगदी गावाला भेटून असतात महार मांग मेलेली ढोरे गाई म्हशी. मारतात व खातात म्हणून महारवाडा व मांगवाडा हे गावापासून किंचित दूर असतात पश्चिमेची शुद्ध हवा मिळावी ह्यास्तव पुष्कळ ठिकाणी ते गावाच्या पूर्वेस आढळतात."

"खेडी म्हणजे गावे हे तिचे भौगोलिक क्षेत्र होते तर शेतीची अर्थव्यवस्था हा तिचा कणा होता. या गावांमध्ये कुटुंबे राहत ती निरनिराळे व्यवसाय करीत, मात्र ते करण्याचा पाया जात व्यवस्था हा होता.

जात व्यवस्थेमध्ये व्यवसाय हे वंश परंपरागत होते आणि जात, कुटुंब आणि व्यवसाय याची एक घट्ट सांगड घातलेली होती. शिवाय जातव्यवस्थेला एक प्रकारेचे धार्मिक अधिष्ठान होते आणि जातीशी निगडित रूढी- परंपरांच्या माध्यमातून धर्म माणसाच्या जीवनाचे नियंत्रण करीत होता.

गावगाडा शतकानंतर अनिल पाटील लिखित पुस्तकाला संपादकीय टिपण लिहिणाऱ्या नंदा खरे यांनी शेतकऱ्यांची व्याख्या दिलेली आहे ती अशी आहे: "शेतकरी म्हणजे साधी सोपी अवजारे वापरत स्वतःच्या व आपल्या कुटुंबीयांच्या श्रमामधून शेतमाल उत्पन्न करणारे छोटे उत्पादक हा शेतमाल मुख्यतः स्वतःच्या उपभोगासाठी आणि राजकीय व आर्थिक सत्ताधाऱ्यांप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांसाठी करासाठी वापरला जातो." (पाटील २०१२)

भारतीय खेडे हे गावगाड्याने आखलेले होते. हा गाडा रचला गेला शेतीव्यवस्थेभोवती कारण शेती हा त्यावेळेसचा व आताही अर्थव्यवस्थेचा कणा राहिलेला आहे .साहजिकच आता परिस्थिती फार वेगळी जरी असली तरी देखील शेतकरी हे गाड्यांच्या केंद्रस्थानी होते , त्यामुळे जमीनधारक असणाऱ्या जातीया गावगाड्यातील प्रस्थापित जाती होत्या. शेतीला पूरक असे उद्योग करणारे आणि गाव सेवा देणारे असे जातसमाज त्या केंद्राभोवती रचलेले होते ते बारा बलुतेदार...(उल्का महाजन)

मग हे बारा बलुतेदार कोण तर, ज्याच्याशिवाय कुण्यांचे अडते ते म्हणजे बलुतेदार. बलुतेदार म्हणजे साधारणतः महार ,मांग ,सुतार ,लोहार ,चांभार, कुंभार , न्हावी ,सोनार , परीट ,गुरव ,कोळी ,ग्रामजोशी.

गावगाडा ही एका बाजूला शेती व्यवस्थेतील उत्पादन प्रक्रिया सांभाळणारी व्यवस्था होती .तर दुसऱ्या बाजूला तिला जातीय संबंध व उतरंड सांभाळण्याच्या व्यवस्थेचे रूप येत गेले. प्रत्येक जातीला गावगाड्यात विशिष्ट भूमिका व विशिष्ट काम होते व ते वंशपरंपरागत होते. जात ही जन्मजात व जात्याधारित व्यवसाय असल्याने व्यवसाय व कामही जन्मजात होते. आपल्या जातीपलीकडचे काम करायला मुभा नव्हती त्यापैकी काही जाती या उत्पादन करणाऱ्या होत्या, जे उत्पादन शेतीला पूरक होते ,तर काही जाती सेवा देणाऱ्या होत्या. (कोसळता गावगाडा उल्का महाजन)

बोकोली म्हणतात, "याचे कारण गाव- गाडा जरी आज राहिला नसला तरी धार्मिक बाबतीत मात्र आत्रे जी परिस्थिती वर्णन करता ती आजही तशीच आहे."

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात 'वतनी' पद्धतीतून निर्माण होणारे आर्थिक व सामाजिक प्रश्न हा आहे. वतन पद्धतीची आत्रे ह्यांनी केलेली व्याख्या;

"जातधंदा वंशपरंपरागत काम, चाकरी, नेमणूक ,उत्पन्न, अधिकार, मानपान ,हक्क ,वडिलोपार्जित मिळकत, स्थावर अगर स्थावरच्या योग्यतेची जंगम मालमत्ता ,जन्मभूमी हा सर्वांना ' वतन' शब्द लावतात."(गावगाडा १६)

ह्याचा अर्थ असा की कोणताही वंशपरंपरागत हक्क म्हणजे वतन होय .

जात आणि जातीचा धंदाही वंशपरंपरागत असतो. त्यामुळे जाती संबंध हक्क आणि कर्तव्ये ह्याचा समावेशही आत्रे यांच्या दृष्टीने वतनपद्धतीतच होतो. आर्थिक दृष्ट्या पाहिले तर जातिसंस्थेचे प्रतिबिंब 'बलुते' पद्धतीत पडलेले असल्यामुळे ही पद्धत व तिचे परिणाम हा आहे.

देशपांडे ह्यांनी बलुतेपद्धत आणि तिचे अर्थशास्त्र ह्याचाच प्रामुख्याने मागवा घेताना सांगतात;

खेडेगावात अनेक जाती आपापला व्यवसाय करीत असतात व हे व्यवसाय वंशपरंपरेने ठरलेले असतात. या व्यावसायिक जातींनी आपल्या वस्तू व सेवा गावातील मुख्य जो शेतकरी समाज याला पुरवाव्या व आपल्या पोटासाठी शेतकऱ्यांच्या उत्पादनातील काही भाग घ्यावा; या भागाला 'बलुते' असे म्हणायचे. हे बलुतेपद्धतीचे मुख्य स्वरूप होय. याशिवाय व्यावसायिक जाती एकमेकीनाही एक वस्तू व सेवा पुरवितात. त्या विनामोबदला पुरवायच्या असा संकेत दिसतो.

त्याकरिता गावाकडे समजून घेणे जास्त महत्त्वाचे आहे विशेषता गावगाड्यातील बलुतेदार आणि त्यांची कामे देखील समजून घ्यावी लागतील. हे समजून घेतांना बदलाचा संदर्भ आपन देत बघत असतो. ह्या मध्ये एक वाक्य बऱ्याचदा आपल्या कानावर एक वाक्य पडत की, "पूर्वीसारखं गाव आता राहिला नाही " हे वाक्य आपल्या कानावर कळत नकळत कधीतरी पडल

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

असते खरं तर हे बोलण्यामागे प्रत्येक काळातले वेगवेगळे तर्क आहेत. त्या मध्ये गावातील होणारा बदल दिसतो. तो दिवसागणित वेगळ्या बदलासह बदलताना दिसतो. काळ तर रोजच बदलत असतो आणि प्रत्येक दिवसागणित सृष्टीमध्ये आणि समाजामध्ये बदल होत असतात. हे बदल कोणते होत आहेत हे समजण्याकरीता मुळात ही व्यवस्था कशी होती हे आपन बघितली. समजणे आवश्यक असते.
त्यासाठी आपण ज्या कोणत्या काळात राहत असू त्या काळाची समाजशास्त्रीय नोंद ही आत्रे यांनी त्याच्या त्या काळात (१८७२- १९३३)अशी नोंद करून ठेवलेली आहे.
महाराष्ट्रात हा गाव - गाडा कसा होता, कसा चालत होता, याची वैशिष्ट्ये कोणती होती हे समजून घेण्याकरिता त्र्यंबक नारायण अत्रे यांनी १९१५ साली प्रसिद्ध केलेले ' गाव - गाडा' नावाचे पुस्तक उपयोगी ठरणारे आहे.
तसेच अनिल पाटील ( सुर्डीकर) यांनी त्याच्या गावगाडा शतकानंतर मध्ये कृषी जनसंस्कृतीचा समग्र परिचय करून देतात त्याचबरोबर खेड्याच्या रचनेचा वेध घेऊन यामध्ये गावगाडा कृषी जनवस्था यांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. ह्यावरुन बदलते ग्रामीण जीवन, गाव आणि गावची संस्कृती, गावातील रचनेत होणारा बदल, गावाने धारण केलेलं नवं रूप, खेड्यापाड्यातल्या मूल्य व्यवस्थेला बसत असणारे हादरे, शेतीबाबतच्या नोंदी, शेतीचा अर्थकारणाचा विचार, तोट्याची शेती, शेतकऱ्यांना लुबाडणारा व्यापारी वर्ग, सहकारी संस्थांची स्थापना, गाव गाड्यांची पर्यायाने शेती व्यवस्थेची असती शेती इत्यादी बाबत पाटील गावगाडा दशकानंतर मध्ये सविस्तर चर्चा करतात.
तसेच उल्का महाजन यांच्या ' कोसळता गावगाडा' २०१५- 'वादळी स्थित्यंतराचे शतक' या शीर्षकाखाली पुस्तकांमध्ये, गावगाड्या सारख्या एखाद्या सामाजिक वास्तव्याला शंभर वर्षे झाली म्हणजे स्थित्यंतर हे होणारच; पण येथील स्थित्यंतराला "वादळी" हे जे गुणात्मक विश्लेषण जोडले आहे, ते अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. वादळ भरकटून टाकणारे;होत्याचे नव्हते करणारे तर असतेच, पण त्याहून उठून उभे राहणारे हे खूप कष्टाचे अवघड असे काम असते. या वादळाने बऱ्यावाईट असणाऱ्या जुन्या गावगाड्यांची अगदी रया घालून टाकली आहे . "गेल्या शंभर वर्षात भारताचा ग्रामीण भाग झपाट्याने बदलला आहे. परंपरा, रुढी ,वहिवाटी ,पूर्वग्रह यावर उभे आडवे फटके या झपाट्याने मारलेले आहेत. शतकापूर्वीच्या परिस्थितीला एकसंधतेला मोठ्या प्रमाणात छेद गेले आहेत. त्यात पहिल्या ७५ वर्षात जेवढे बदल झाले त्यापेक्षा तीव्र गतीने बदल गेल्या २०- २५ वर्षात झाले आहेत ह्याची त्या नोंद करतात. सरंजामी व्यवस्था ते औद्योगिक वित्तीय भांडवलशाही असे स्थित्यंतर झाले आहे. या प्रवासात गाव कसे बदलले आहे. हे गावकऱ्यांच्या आठवणीतून समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. २६ गावांचे सर्वेक्षण करून आजच्या कोसळत्या गावाचे चित्र उल्का महाजन यांनी उभे केले प्रत्यक्ष पाहणीच्या आधारावर.
उल्का महाजन यांच्या "कोसळता गावगाडा" २०१५ या पुस्तकातून अनुभवातून अभ्यासपूर्ण पाहणी व मांडणीतून मांडलेला गाव.
त्यानंतर आता २०२५ एका दशकाचा काळ लोटला.यादरम्यान गावगाडा कसा आहे हे बघताना,
मी लहानपनापासून ज्या गावात राहली ते माझं गाव गावगाड्याच्या कोसळत्या ह्या दृष्टीने कसा कोसळत गेलं ते मांडण्याचा प्रयत्न ह्या लेखातून करणार आहे.ह्या एक दशकाचा काळ उलगडायला मदत झाली. ते मी ह्या लेखाच्या माध्यमातून मांडू पाहते आहे. मी अनुभवलेला आणि बघितलेला गाव ,प्रत्यक्ष अनुभव ,सर्वेक्षण , केस स्टडी आणि गट चर्चेच्या माध्यमातून अतिशय जबाबदारीने मांडते आहे. त्या गावातला वॉर्ड वस्ती आणि गावातला सण ह्या सगळ्याचा संदर्भ ह्या मध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.
आत्ताचा एक दशकाचा अर्थातच २०२५मध्ये असणारा गावगाडा कसा आहे याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.
यामध्ये मी विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील अल्लिपुर ह्या गावातील निरीक्षण नोंदविले आहे,
गावांचा केस स्टडीच्या माध्यमातून उलगडा करण्याचा प्रयत्न भारतीय ज्ञान परंपरा आणि गावगाड्या आत्ताची असणारी जातीय वास्तव्याची स्थिति हा आधार घेवून मी यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. गावातली जातीय उतरंड असणारे आताचे वॉर्ड.. किंवा पुरा हे कसे आहेत ह्या संदर्भाने.

**दोन दशकांनंतरचा गाव एका गावचं निरीक्षण सर्वेक्षण आणि अनुभवाद्वारे: अध्ययनातील गाव;**

विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुका या तालुक्याला कापड मिलसाठी प्रसिद्ध असलेल्या तालुक्यातील अल्लीपूर हे सर्वात मोठा गाव असणाऱ्या गावाचा अध्ययन व अनुभवातून गावगाडा या संकल्पनेला घेऊन त्या गावाविषयी माहिती संदर्भित केली आहे.
अल्लीपूर हे गाव लोकसंख्येच्या दृष्टीने तालुक्यातील मोठं गाव आहे. या गावाला बाराशिवाच गाव असं देखील म्हटलं जातं त्या बाराशिव म्हणजे पवनी, शिरजगाव ,कांचनगाव ,गाडेगाव, अलमडोह ,टाकळी ,धोत्रा, एकूली ,एरनवाडी ,पिंपळगाव, कानगाव ,मनसावळी ह्या आहेत. पूर्वीपासूनच ह्या गावात बारा शिव असलेले लोक बाजाराला यायचे आणि आता देखील सर्वात मोठा बाजार हा अल्लीपूर या गावी भरतो . गावाला एक मोठ गोठान आहे, त्या गोठाणावर शेतकरी आणि शेतमजूर जमतात. ज्यांना शेतात त्या कामाकरिता मजूर हवे असतात ते तिथे येऊन ,कामाकरिता मजुराची निवड करून शेतीच्या कामाकरिता नेतात .आणि मजूरही सांगेल त्या मालधनाच्या कामाला त्यांच्या शेतावर निधन, कुरूपण, पेरणी ,डवरणी, कापूस वेचणी, कापणी, फवारणी याकरिता जातात. अगदी गोठणालाच लागून बैलांची दावण आहे तिथे शेतकऱ्यांना लागणाऱ्या कामासाठी बैल विकत घेण्याची सोय देखील आहे. गावामध्ये जास्त शेतकरी वर्ग असल्यामुळे त्यांना शेतमजुरी करिता लागणारे मजूर हे सहसा बिगर शेती असणारे आहेत किंवा ज्याच्याकडे कमी शेती आहे आणि उदरनिर्वाहासाठी ते आपल्या शेतातील काम करून मजूर म्हणुन दुसऱ्याच्या शेतात मंजुरीला जातात .

गावामध्ये आबाजी महाराजांची मोठी दहीहंडी साजरी केली जाते या गावाची परंपरा आहे. मुली आपल्या माहेरी दिवाळीला न येता दहीहंडीला येतात. भावाला ओवाळायला आणि माहेरपण घालवायला .दहीहंडीचा हा उत्सव दोन दिवस असतो. पहिल्या दिवशी बाजार ओळीतील दहीहंडी जवळ तर दुसरा दिवस हा गरोबा ज्यामध्ये एक कुटुंब गळी लागते. त्याला गावात मोठ्या मानसन्मानाने आणि आदराने बघितले जाते .

या गावाची मतदार यादीनुसार दहा हजार लोकसंख्या आहे. या गावाला एकूण सहा मुख्य वार्ड आहे ,तर तीन चार वार्ड हे कुठल्याही नावासोबत आहे ते राहणाऱ्या किंवा त्या आजूबाजूच्या लोकांनी त्यांना नाव दिली ते फुकट नगर म्हणून तर कोणी हिणवलं तर समता नगर म्हणून त्या वार्डचा उल्लेख बोलचालीत करतात .

खरंतर या गावाला बारा शिवेचा गाव अशी देखील ओळख आहे. ह्या गावांमध्ये आजूबाजूला लहान लहान गाव वसले होते. दुष्काळ..रोगराई मुळे गावच्या गाव उद्ध्वस्त होत होते.., हे कुठेतरी थांबवा म्हणुन आपल्या गावची शिव सोडून ह्या गावात आपल बिऱ्हाड घेवून आलेत आणि इथेच वसले म्हणुन ह्या गावाला बारा गावची शिव असलेले गाव अशी ओळख आहे. आजूबाजूच्या बारा गावची लोक बाजारहाट करण्याकरिता ह्या गावात येतात. गावाला गडीचा मोठा वाडा होता. वाडा जरी आज नसला तरी काही अंशी त्याचे अस्तित्व अधोरेखित करणारी गडीची जागा तेवढी आहे.

आता सध्या ह्या गावांमध्ये जिल्हा परिषदची शाळा आहे. मुख्य वाडा असणाऱ्या चिटणीसांच्या जागेवर जी ग्रामपंचायत च्या ताब्यात ती जागा आहे. मोठा बाजार परिसर गडीच्या समोरच आहे. अनेक व्यावसायिकाचे दुकाने आहेत. ह्या गावा शिक्षणाची सोय अतिशय चांगल्या प्रकारची आहे जिल्हा परिषदेची केंद्रीय कन्या शाळा आणि मुलांची शाळा अशा दोन वेगवेगळ्या शाळा गडीवरच्या जागेवर आताही आहेत .गावातीलच असणारे खोडे या गृहस्थांनी इंदिरा गांधी कन्या शाळा पूर्वी काढली होती आता त्या शाळेमध्ये मुला आणि मुली दोन्ही शिकतात. या शाळेच्या पूर्वी ग्रामीण भागामध्ये देशमुख यांची यशवंत शाळा बारावीपर्यंत जी बारावीपर्यंत शिक्षण देते गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पशुवैद्यकीय दवाखाना आहे. एकूणच पाहिला गेला तर हा गाव सदन या वर्गवारीत मोडतो. इतर ग्रामीण क्षेत्राप्रमाणे याही गावांमध्ये 1962 च्या दरम्यान मिशनरीचा प्रभाव दिसायला लागला धर्मदाय या भावनेतून आलेला मोर साहेबाचा बंगला ह्या गावा दोघेही नवरा बायको डॉक्टर होते आरोग्याच्या संदर्भातील त्यांचा प्रभाव गावावर मोठ्या प्रमाणात होता मोफत किंवा दोन-चार रुपयात रुग्णांवर उपचार केला जात असे आता त्यांची कॉन्व्हेंट आहे जी की आता व्यावसायिक झाले आहे .महार म्हणून समजला जाणारा एक घर ख्रिश्चन झालं .धर्म परिवर्तनाचा प्रभाव गावांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो जी गरीब आहेत त्यांना आमिष दाखवून धर्म परिवर्तन केले ह्या गावातील मातंग समाजातील सर्वच घरे ख्रिश्चन धर्मात परिवर्तित झालेली आहे.

किशोर कांबळे वय वर्ष ८५ हे ह्या विषयी सांगताना म्हणतात की, गाव कित्येक दशकापासून आहे. ह्याच गावातील असलेल्या गडी विषयी जाणून घेण्यासाठी आता जी गडीवर जिल्हा परिषदेची शाळा आहे तिथे मोठा वाडा होता . तो वाडा चिटणीस ह्याचा होता.त्याचे वंशज आज नागपूर मध्ये कित्येक पिढ्या पासून वास्तवास आहे. ते सांगतात की,

गावातली धाब्याची मोठी घरे आहेत ते त्या वाड्याच्या मातीची बांधली आहे. माती पांढरी होती म्हणून घरे मजबूत आहेत. त्या गडीची माती काढताना कित्येकाला सोन्याचे चांदीचे हांडे भरून दागिने भेटायचे. आजही त्या गडीला खोदुन सपाट केलं तर कित्येक तरी वस्तू मिळतील. आता ती जागा ग्रामपंचायतच्या ताब्यात आहे. त्या उध्वस्त झालेल्या गाडीवर जिल्हा परिषदेची शाळा आहे. विशेष म्हणजे एक नोंद करण्यासारखं आहे की वाडा पश्चिमेला आहे. समोर मोठी बाजार लाइन आणि गावातली सर्वात उंच जागेवर तो होता. आता ही तट आहेत.बारा वेशीचा गाव आहे.

आज ते गाव दहा हजार लोकंसखेच्या वर असलेल्या ह्या गावची कोणी ओळख विचारली तर, तेली समाजाचा ह्याचा गाव म्हणूनच गावाला ओळख आहे. बहुसख्य शेती करणारे हे तेली आहे. तर एकूण त्याची लोकसंख्याच्या ७५टक्के हा तेली समाज आहे..आणि तो बहुसंख्य शेतकरी आहेत आणि बाकी इतर २५ टक्के उर्वरित आहेत. एखाद दुसऱ्या जातीकडे थोडी फार शेती होत.. कोणाला मिळालेली तर कोणी घेतलेली. गावाची मालकी असणारे चिटणीस यांनी आपल्या जमिनी इतरांना दान केल्या.. काही जमिनी सरकार ने सीलिंग कायद्याने अंतर्गत आपल्या ताब्यात घेतल्या. गावातील मंज्जित आहे ते जागा देखील दर्गा साठी त्यांनीच दिली.

फार पूर्वी ह्या गावात एक कुटुंब चिटणीसांच्या काळात आलं. खत्री नावाच तो माणूस अत्यंत बलशाली पहलवान होता . त्याला वाड्याची देखभाल करण्यासाठी ठेवण्यात आले, तर त्या भंगी असणारे खत्री ह्या कुटुंबाला कित्येक एकर जमीन बक्षीस म्हणून दिली गेली आहे. आज देखील त्याच्या कडे त्याच्या जमिनी आहेत. कुटुंब मोठं होतं गेल आणि जमिनीचे तुकडे झाले. मग आपापल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी धंधा करने सुरू केले. कोणाची दळण चक्की आहे तर कोणी आपापल्या सोयीनुसार काम करू लागले.

ह्या अत्रे ने सागितलेल्या गावगाडा तपासायचे म्हटले तर काही अंशी खरे दिसून आले .कारण दोन शतकाचा कालखंड लोटून गेला आहे त्याच्या ह्या निरीक्षणाला .

पूर्वीचे महार असणारे आताचे बौद्ध , मातंग, खाटिक, कसाब, ह्याचे घर पूर्वेला आहेत. खर तर कित्येक दशकं झाले गावाने आपली जागा सोडली नाही. ती आहे तिथेच आहे.

ह्यातले आधी असणारे आताचे बौद्ध पूर्वी जेवढी होती ते आता अर्धी देखील राहिली नाहीत. शिक्षणामुळे त्यांनी गाव सोडले त्यात जास्त प्रभाव डॉ. बाबासाहेब ह्याच्या प्रभाव तिथपर्यंत पोहचला. आणि कित्येक तरुणाने गावं सोडले.

**गावगाडा आणि बलुतेदार: व्यवसाय आधारित उतरंड**

**गावकुसाबाहेरील बलुतेदार**:

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

महार: आत्रेंनी लिहिलेल्या 'गावगाड्या'तील बलुते -आलूते प्रकरणातील 28 पैकी 21 पाने महार बलुतेदारावर आहेत. त्यामध्ये त्या काळातील महार समाजाची कामे गाव नौकर, जागले व वेसकर म्हणून होती, त्याबद्दल त्यांना काही ठिकाणी इनाम जमिनी तर काही ठिकाणी रोख मुशाहिरा मिळत असे,तसेच गावकऱ्यांकडून बलुते, ठरलेले हक्क मिळत असत, अशी नोंद आहे.

त्याकाळी महार जागले हे पाटील कुलकर्ण्यांचे हरकामी शिपाई होते .निरोप धाडणे, आवश्यक त्या माणसांना बोलवून घेणे, सरकारी हद्द निशाण्या बिघडल्या, अतिक्रमण झाले तर त्याची वर्दी देणे , गाव स्वच्छ ठेवणे, गस्त घालणे , गावची कागदपत्रे पोचवणे ,पाटलांबरोबर परगावी जाणे, सरकारी अधिकाऱ्यांची सरबराई गावाची वेश राखणे इत्यादी कामे ते करीत असत, असा उल्लेख आहे.

काही ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे महार काय काम करायचे ते स्पष्ट होते..,

"स्वराज्याचा आधारस्तंभ असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा हेरखात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक याला सर्व गुप्त माहिती व बातम्या त्याचे विश्वासू महारसाथीदार पुरवत असत." जेम्स ग्रँड डफ 'हिस्टरी ऑफ दि मराठा' महार रेजिमेंट इतिहास, पृष्ठ-७

"शत्रूस हुलकावणी देऊन भ्रमित करून त्याच भलतीकडेच नेऊन अगदी शत्रू सैन्याची दमछाक करण्याची महत्त्वाची जबाबदारी असलेल्या (हूल) पथकात असलेले सर्व सैनिक हे फक्त महारच असत." मेजर आर.एन. बेहतम- महार रेजिमेंटचा इतिहास, संपादक -बलचंद्र तिवारी ,प्रकाशक- ब्रिगेडियर ईश्वरदत्त

"महारानी छ. शिवाजी महाराजांच्या बरोबर राहून कान्होजी आंग्रेच्या नेतृत्वाखाली समुद्रातील युद्धात जे पारंगत्व मिळविले, त्यामुळे ते 'मरीन बटालियन'चा फार मोठा भाग बनले. त्याचबरोबरीने मैदानी युद्धातही बहादुरीने लढून, लौकिक प्राप्त करून त्यांनी अनेक पुरस्कार तर प्राप्त केलेच,शिवाय सैनिकी सेवेत आपल्या इमानदारीने व पराक्रमाने अनेक उच्चविक्रमी स्थापित केले ." महार रेजिमेंटचा इतिहास पृ.१५

"पुरंदरच्या सर दरवाज्यावरील ढालीचे संरक्षण (ढाल म्हणजे निशान ,झेंडा) व बालेकिल्ल्याच्या घेरयाची महत्त्वाची व मानाची जबाबदारी तिथल्या 'बेगळे' आडनावाच्या महारावर सोपविलेली होती." शिवचरित्र साहित्य- लेख ९२ पृ.१११-११२

"पुरंदरच्या युद्धात दिलेरखानाने सोडलेल्या बाणाने कंठाचा वेध घेतला जाऊन किल्लेदार मुरारबाजी धारतीर्थी पडला, तेव्हा सरदरवाजावरील ढालीचे व बालेकिल्ल्याचे संरक्षण करणारे महार सैनिक मिशीवर पिळ देत गरजले. "एक मुरारबाजी पडला तरी काय जाहले? आम्हीही तैसेच शत्रू आहोत, ऐसी हिम्मत धरून भांडतो." राजा शिवछत्रपती-ले. बाबासाहेब पुरंदरे

पुरंदरच्या तहात मोगलांकडे गेलेला कोंढाणा किल्ला किल्लेदार उदयभानू कडून जिंकून पुन्हा स्वराज्या सामील करण्यासाठी तानाजी मालसुरे यास कोंढाणा किल्ल्याच्या चोरवाटा ,चौकी पहाऱ्याच्या जागा व किल्ल्यावर असलेल्या शिबदीची खडानखडा बातमी रायाजी घेरे सरनाईक ,गोदनाक महार, मल्हारबा ,रानबा, शिदबा महार इ.महारानीच पुरविली व यशवंता महार हा अवघड कडा घोरपडी सारखा सरसर चढून वर गेला व तेथील. बहाव्याच्या झाडाला दोर बांधून तो त्याने तानाजी व सैन्यासाठी खाली सोडला. गड आला पण सिंह गेला' ले.ह. ना.आपटे पृ.७१,८८,९४.

छ. संभाजी महाराज यांना औरंगजेबाच्या कैदेतून सोडविण्याचा शेवटचा सशक्त प्रयत्न रायाप्पा महार याने केला. या प्रयत्नात रायाप्पा यास आपल्या प्राणाचे बलिदान द्यावे लागले .त्यानंतर झालेल्या संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर संभाजी महाराजांच्या मृतदेहाचे तुकडे गोळा करून , स्वतःच्या जीवावर उदार होऊन त्यांच्यावर सन्मानाने अंत्यसंस्कार करणारा शूरवीर गोविंदनाक गोपाळनाक हा महार होता. औरंगजेबाच्या ४०,००० बलाढ्य फौजेला अवघ्या ६०० सैनिकांच्या तुटपुंज्या शिबदिनीशी रामसेज किल्ला सतत सहा वर्ष झुंजवत ठेवणारा रामसेजचा शूर किल्लेदार हाच गोविंद गोपाळ महार होता. संभाजी- ले. विश्वास पाटील पृष्.७५६-७६२,८२२-८२८

मोगल बादशहा औरंगजेबाने आपल्या शहजादीचे संरक्षण म्हणून पन्हाळ्याच्या महारावर ही जबाबदारी सोपवून त्याबद्दल त्यांना पन्हाळ्याच्या आसपास काही जमिनी इनाम दिली होती." महार रेजिमेंटचा इतिहास' पृ.५. स. बालभद्र तिवारी ,प्रकाशन -ब्रिगेडियर ईश्वरदत्त

१७३८ साली नागेवाडीच्या कोंडनाक महार या सरदाराने जंजिऱ्याच्या युद्धात मोठा पराक्रम केला. त्याची हिंमत व रणकोशल्य पाहून थोरला बाजीराव पेशव्यांनी भारावून जाऊन कोंडनाकास मिठी मारली व आपल्या गळ्यातील सोन्याचा कंठा स्वतःच्या हाताने त्याच्या गळ्यात घातला ." 'क्रांतिवीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पृ.१२,१३ ले. भाऊ लोखंडे

१७३९ च्या वसईच्या मोहिमेत किल्ल्याच्या तटावरून सततच्या होणाऱ्या बंदुकीच्या माऱ्याला न जुमानता तटास भिडून शिड्या लावून किल्ल्यावरील पोर्तुगीजांचा ध्वज काढून तिथे मराठ्यांचा भगवा फडकविण्याचे जिगरबाज काम तुकनाक महाराने केले. यात त्याला सीता महार ,फकीरा महार, वीरा महार ,यमा महार , हंसा महार या महार शूरवीरांनी मदत केली." 'महार-मांग संबंध' पृ.६९,ले. प्रा. वी. सी. सोमवंशी

मध्यप्रदेशातील 'श्रीवर्मा' नावाच्या राजाचा 'सत्यपाल' नावाचा महार सेनापती होता. क्रांतिवीर डॉ आंबेडकर- पृष्१३ ले. भाऊ लोखंडे

बहमणी, निजामशाही, आदिलशाही , सल्तनततील तसेच ,मोगल बादशहा व छ. शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई यांच्याही काळात महाराना किल्लेदार म्हणून नेमणुका मिळाल्या होत्या. 'वाकनगिरी' या किल्ल्याच्या आदिलशाही किल्लेदार. पामनाक व त्याचा भाऊ रामनाक हे महारच होते. 'अस्मिता दर्शन' पृ.६४,६५.अंक ८०

मराठ्यांनी मिळवलेला शेवटचा विजय म्हणून इतिहासात ज्या खर्ड्याच्या लढाईची नोंद आहे, तो खर्ड्याचा लढाईतील विजय पेशव्यांना सांगली जिल्ह्यातील 'कळंबी' या गावच्या 'शिदनाक' नावाच्या शूर महार सरदारानेच मिळून दिलेला होता. 'खर्ड्याच्या स्वारीची बखर'
महार हे शूर लढवय्ये होते हे स्पष्ट पणे दिसते.. यावरून आपल्याला कळतं की ,कुठल्याही प्रकारचं काम शूर व लढवय्ये कामे करण्यासाठी महार होते . ही त्याची लढवय्ये वृत्ती त्याच्या स्वत:साठी वतनदारी पूर्तीच मर्यादित ठेवून..त्यांना अस्पृश्य वागणूक मिळू लागली. ते वतनी जमिनी च्या दस्तान सापडतील.
.वतन : पिढीजात चालत आलेल्या जमिनीची.
खरं तर एखाद्या महारवाड्याचा दस्त जर तुमच्या हातात पडला ना तर ते भोगवटादाराच्या नोंदी खाली येतात. . त्यात तुम्हाला. मिळतील त्याच्या घामाचे शेकडो शेकडो समुद्र, अन्याय सोसणारे हजारो चेहरे अनेक पिढ्या ज्यांनी प्रेताच्या अंगावरचे जुन कापड अंगावरती न्याल. शाळेतल्या पाटीवरती त्यांना कधी लिहायला मिळालं नाही .अन्यायाविरुद्ध मुठी वळवणारे महारवाडे गावाच्या वेशीला तुम्हाला इथं मिळतील.
महार वतनदार ..,ते महार वतनाच्या कोरभर जमिनीच्या मोबदल्या शेकडो पिढ्यांनी जो अन्याय आणि अत्याचार सोसला त्याची गोष्ट.
आपण एक गोष्ट जाणतो की जमिनीचा आणि सामाजिक प्रतिष्ठेचा आर्थिक गणिताचा किती जवळचा संबंध आहे.भटक्या विमुक्त कडे जमिनी नाही ,त्यांना आरक्षण मिळत ना सामाजिक प्रतिष्ठा. बाबासाहेब आंबेडकरांनी टोकाचा संघर्ष सामाजिक समतेसाठी न्यायासाठी केला आहे. तरी सुद्धा महार वतनातील मिळणारी आयती जमीन त्यांना का नको होती ,बाबासाहेब आंबेडकरांनी सरंजामी व्यवस्थेतल्या अन्याय अत्याचाराची असे कोणते चॅप्टर उघडे केले. त्याबद्दल आपण बघूयात
महार वतन समजून घेण्याआधी वतनदारी काय होती हे समजून घेऊयात .
वतन : पिढीजात चालत आलेल्या जमिनीची मालकी मध्ययुगीन प्रशासकीय व्यवस्थेपासून आजच्या प्रशासकीय व्यवस्थेपर्यंत चालत आलेली .
शेतकऱ्यांच्या जमीनदाराच्या आणि सहजामदाराच्या रोजच्या जीवन व्यवहारात महत्त्वाचा
मोबदल्याचे तीन प्रकार पडतात
१)अन्नधान्य
२) मानपान :यात्रा जत्रा
३)जमिनीची मालकी देणे, ही जमीन वतन
ही अन्याय शोषणाधारित होती.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगतात की महार वतनामुळे संपन्नता येण्यापेक्षा उलट खच्चीकरणात जास्त झाले हे आंबेडकरांचे ठाम मत होते गावचे पूर्वी वतनाच्या जमिनी देताना बऱ्याचदा जिरायती किंवा नापिक जमिनी द्यायच्या सुपीक जमिनी स्वतः कडे ठेवायच्या त्यामुळे या जमिनीमध्ये फारसं काही पिकायचं नाही आणि याचा उलट या वतनदारीच्या बदल्यात बारा तास काम करून घ्यायचं अन्नधान्याचा मोबदला मिळाला तो प्रचंड कमी मिळायचा शिवाय बहिष्कार याला मारहानीला अत्याचाराच्या घटना वारंवार व्हायच्या बाबासाहेब म्हणायची की ही बलुतेदारी पद्धती जी आहे याबद्दल सामाजिक खच्चीकरण होते आहे आर्थिक खच्चीकरण होते आहे. जर आर्थिक सबलीकरण करायचे असेल आणि सामाजिक प्रतिष्ठा ही आर्थिक सबलीकरणातूनच येणार असेल तर मग वतनाच्या जमिनी घेऊन.
अत्रे याच्या संपूर्ण बलुतेदारांच्या प्रकरणात महार हेच बलुतेदार गावात सर्वात वरचढ असावेत असा समाज आत्रेच्या लिखाणावरून होतो त्या काळाच्या गावातील जातीय उतरंडीत महार समाजाचे स्थान कुठे होते याचा फारसा बोध त्यातून होत नाही.

**महार आताचे बौद्ध..,गाव निरिक्षण..;**

पूर्वी गावात 100 घरे होते, त्यातील 35 घरांनी गाव सोडले. काम धंद्यासाठी, कोणी तालुक्याच्या ठिकाणी गेले तर कोणी जिल्ह्याच्या किंवा मोठे शहर असणाऱ्या ठिकाणी काम-धंधा करतात येईल म्हणुन गेले . कोणी नोकरी साठी. जेव्हा बलुतेदारी होती त्या पिढी गावातला महार हा कोतवाल होता.. संपूर्ण गावात एकूण 5 कोतवाल होते . व्यापार नौकरी दुसरी पिढी. डॉ. सिव्हिल सर्जन, सिव्हिल इंजिनियर, इंजिनियर वकील, बाबू, मास्तर भट्टीचे व्यापारी कापसाचे चिल्लर व्यापारी शिक्षण अधिकारी, चार पाच श्रीमंत होते..त्याच्याच कडे शेती होती..रोज मजुरीने जायचे.. गावामध्ये महाराच पहिल किराणा मालाच दुकान होत ते वासुदेव कांबळे याच दुकान होत... बाबासाहेबांच्या सांगण्याचा प्रभाव गावापर्यंत पोहोचला आणि त्या काळातल्या पिढी शिकायला लागल्या शिक्षण घेऊन नोकरी करतात आज पूर्वीचे महार असणारे आताचे बौद्ध असलेले गावातील असं एकही घर नाही ज्यांनी शिक्षण घेतलं नाही शिक्षणामुळे नोकरी मिळाली त्यामुळे गावातला मानसन्मान उंचावला पण आजही बऱ्याच प्रमाणात बौद्ध गावातलं असं एकही घर नाही शिक्षण आणि नोकरी करतात.
आता ह्या पद्धतीला घेवून बघायला गेल तर गावच्या बाहेरच एका वेशीला बौद्धांची १०० होती,त्यातील दुसऱ्या पिढीतील ३५घरे शिक्षणासाठी तर कोणी काम, व्यवसायासाठी गाव सोडलं. ह्या गावातील महार जे आता बौद्ध आहेत ते अतिशय सुज्ञ आणि जागरूक होत्ये त्याच्यावर बाबासाहेबांचा आणि बॅरिस्टर खोब्रागडे ह्याच्या विचाराचा मोठा पगडा होता.गावाच्या मुख्य दरवाजा असलेल्या कमानी पासून कितीतरी लांब अगदी शेवट्याच्या टोकाला विचारण्यात आले तर.., गावाच्या शेवटच्या टोकाला त्याची घरे आहेत. अजून तरी गावामध्ये पूर्वीच्या घराची जागा सोडून कुठल्या तरी गावातल्या गावात गावच्या स्थानिक वस्तीत बौद्धांची घरे माझ्या तरी बघण्यात नाही आली. ही गोष्ट वेगळी की, लोकसंख्या वाढली. एका घराचे चार घरं

झाले पण ते कुठल्या तरी लगतच्या भागात किंवा नव्याने तयार झालेल्या एखाद्या अनधिकृत जागेवर.. ज्याला बेघर किंवा फुकट नगर असे नाव देण्यात आले आहे.. तिथे राहतात कोण तर ज्याच्या कडे काहीच निवाऱ्याची सोय नाही ते.. चार पत्रे घेवून राहू लागतात. असे राहणारे लोकं म्हणजे मातंग.. मुस्लिम, बाहेरून कामा साठी आलेले आदिवासी गोंड, कोलाम तर एखाद दोन घरं बौद्धांची आहेत.
पूर्वीच असणार गावगाड्याचे मूळ बौद्ध वस्तीतील घरे मोठी मोठी सिमेंट काँक्रेटची एक मजली तर काही दुमजली आहे. तीन पुढ्यापूर्वीची महार काय करायचे तर काही पूर्वाश्रमित असणारी कामे करायची जी आखून दिलेली होती. पण एक वर्ग ह्यामध्ये व्यापारी होता. जो व्यापार करायचा. त्याची पहिली पीढ़ी ही शिक्षण घेवून गावातून बाहेर पडली. शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वरचढ ठरली आहे.

मातंग(मांग): गावकुसाबाहेरच्या बलुतेदारापैकी दुसरी जात मांग- मातंग. महाराचे बलुते होते. वेसकर, जागल्याचे, त्यातले जागल्याचे काम अनेक ठिकाणी मांग समाजाकडे असे. काही ठिकाणी त्यांनी वेसकरकीही सांभाळली. त्याशिवाय केरसुण्या, शिंकी- कासरे ,नाडे ,आटणे , जुंपण्या , वेलहे ,वेठण, मोहक्या, पिछाडया, प्रेताची सुतळी बनवणे, फड़े बांधणे ही मांगाची कामे होती. त्याबरोबर मरीआईची पूजा बांधणे, फाशी देणे, देवासमोर व लग्नकार्यात वाजवणे ही त्यांची पारंपरिक कामे होती .त्या बदल्यात त्यांना बलुते म्हणजेच ठरलेल्या प्रमाणात धान्य मिळे. गावात जे मुख्य धान्य पिकते त्याचे शेकड्यात चार ते सहा या प्रमाणात महारांना व शेकडा दोन ते चार जागल्याना मिळत असे. सुगी झाली, शेतमाल तयार होवून खळे लागले व धान्याच्या राशी पडू लागल्या, की त्या धान्याचे. बलुते शेतकऱ्यांने म्हणजे प्रामुख्याने कुणब्याने बलुतेदारांना आलूत्यांना द्यायची पद्धत होती . हे प्रमाण वर सांगितल्याप्रमाणे ठरले होते. (कोसळला गावगाड़ा उल्का महाजन)
या पारंपारिक गाव गाड्यात मांगा मध्ये काय बदल घडले ते बघुयात.,
पूर्वी मातंगाचे तीनच घरी होती आता तिसऱ्या पिढीनंतर मातंगांची एकूण 11 घरे ही बौद्ध वस्तीत लगत असणाऱ्या अण्णाभाऊ साठे नगरात आहेत. त्यातले काही कुटुंब हे जिथे खुली जागा मिळेल गावाच्या बाहेरची तिथे त्यांनी आपली कुळाची घरे बांधली आहेत. मातंगांचा पारंपारिक व्यवसाय फडे बनवणे, लोखंड बांधणे ,गाव वाजवणे, हलगी बँड वाजवून आपला उदरनिर्वाह करणे हेच आताही केले जातं. तर काही किरकोळ कामे जसे की फुटलेल्या भांड्यांना टिकली लावणे, तेलाच्या पीप्या पासून दरवाजे बनवणे दाग डूजी करणे इत्यादी कामे केली जातात. बाळंतपण करने, डिलिव्हरी करणे डिलिव्हरीच्या बाईचा अंग मालीश करून देणे, मालिश करणे, फडे बांधणे आणि इतरांच्या घरची धुनी भांडी करणे, मजुरीच्या दिवसांमध्ये शेतावर मजुरीला जाणे हे काम आताही सुरूच आहे यातले बहुतेक मातंग हे धर्मांतरीत आहे. ज्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे पण काम मात्र ते आजही पारंपारिक व्यवस्थेने नमूद केलेली करता आहेत त्यांच्या एकूण पिढी पैकी आज एकही पिढी शिक्षणात नाही जेमतेम एखाद दोन दहावी बारावी झाली आहेत त्यांच्या वाट्याला ही काबाडकष्ट आले आहेत.
आता ही हे अमावस्या मागतात. सनवार मागून खातात. नवीन पिढी सोडली तरी जुने म्हातारी किंवा त्याची मोठी मुले हलगी वाजवुन सन मागतात. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मांग मिळून सण मागायला जायचे दिवाळी संक्रांत शिमगा वेळ अमावस्येला त्यावर फिरायचे हे काम मांग बायांचे सगळ्या शिवारातून फिरून दुरड्या घेऊन घरोघरी मागायला जाणार पोळ्या भाकरी भजी देण्यात ते घेऊन यायचे जास्ती झाले तर ते चुकून खायचे अजूनही गावात दवंडी मागत देतो त्याचे पैसे पंचायत किंवा दवंडी सांगणारा देतो.आजही त्यांना गावांमध्ये मांग वाजवणारा याच नावाने. तुच्छतेने ओळखलं किंवा बोलला जातो
हलगी वाजवली नाही म्हणून मातंग कुटुंबावर बहिष्कार टाकल्याची बातमी वाचल्यावर जिजांनी सांगितलेली हलगीची गोष्ट आठवली. हा किस्सा एकनाथ आढाव त्यांच्या 'जग बदल घालुनी घाव' या पुस्तकात सुद्धा आहे.

बाबासाहेबांनी सांगितलं खेडी सोडा शहरात जाऊन रहा. हे ऐकून गावातील महार आणि मांग प्रभावित झाले. त्यांनी शहरात जायचा निश्चय केला. मुंबईला जाण्यासाठी महार आणि मांग एकत्रित जवळच्या स्टेशनला पोहचली. स्टेशनवर बरीच गर्दी झाली. काही क्षणातच स्टेशनवर मुंबईलाला जाणारी रेल्वे आली. गाडी येताच एक गंमत झाली. महार लोकं पटकन गाडीत शिरली. त्यांनी आत जागा पकडली. पण मांग आत चढायला बघतोय तर दरवाजातून आत चढताच येईना. जो तो आत जायला बघायचा पुन्हा अडकायचा. पुन्हा प्रयत्न करायचा पुन्हा अडकायचा.
हे असे का होत होतं? पुढे त्यांनी त्याचं कारण सांगितलं,
महार लोकं आत गेली कारण त्यांनी स्टेशनवर येताना गावातून जुनं काहीच आणलं नव्हतं. मांग आत जात नव्हता कारण त्यानं येताना काखेत अडकवून हलगी आणली होती. हलगीमुळं मांगाला आत चढता येत नव्हतं.
मांग ज्या क्षणाला हलगी म्हणजे गावातील गावकी करणं सोडेल त्यानंतरच त्याची प्रगती होईल. हलगी काखेत अडकवून त्याची कधीच प्रगती होणार नाही.
हा किस्सा आजही महाराष्ट्रातील मांग आणि चर्मकार लोकांना लागु पडतो. गावात मिळणारी वागणूक हा सन्मान वाटत असला तरी ही गुलामी सोडून त्यांनी स्वयंप्रकाशित व्हायलाच हवं...

चांभार: गावगाड्यात महार, मांग. या वेसकर , जागल्यापाठोपाठ बलुते घेणारी ,पण गावकुसाबाहेरची जात म्हणजे चांभार. चाभाराची बलुत्यातली पारंपरिक कामे होती, चामडे कमावणे, मोट शिवणे, तिला ठिगळ लावणे, गोफनीला टवळे लावणे,

जुना जोडा आसूड साधने ,नवीन जोडा, मोट, रोख पैशाच्या बदल्यात बनवणे. चांभाराला साधारणतः दोन शेर बी व शेकडा सव्वा दोन बलुते ठरलेले होते.
गावात चांभार समाजाची आठ ते दहा घर आहेत. त्याचीपहिलीपीढ़ीहीअशिक्षित तर दुसरी पिढी चार वर्ग का होईना शकली.. तिसरी शिकली व्यवसाय आहे चप्पल बनवण्याचा . पहिली पिढी चमडा व्यवसायाचे जोडे. दुसरी पिढी चमडा व्यवसाय आणि चपला जोडे बनवायचे आणि तिसरी करते कमर्शियल. व्यावसायिक आहेत.
आज देखील गावात कित्येक वर्षापासून पुरोहितांच्या भिंती लगत पोत टाकून आपली एक पेटी घेवून दुकान सुरू करतो. तुटलेल्या चप्पल शिवणे, टाका मारणे.. कोणी जुन्या एखाद्या व्यक्तीने टायरची चप्पल सांगितली तर ते बनवून देणे..चामड्याच्या चप्पल बनवणे हा काही व्यवसाय त्याने केला नाही. पुरोहित्याच्या घराच्या भीतीजवळ बसतो.ह्या वरुन कळतं की, चामड्याच काम केलं असतं तर बसूच दिलं नसतं..
कोणी गोण्या आणल्या तर त्या शिवून देणे..चप्पलेला खिळा मारणे.., आता तर शाळेच्या फाटलेल्या बॅग शिवून देताना पाहिले आहे. ह्यावरच त्याचं घरं चालतं. घरी शेती नाही त्याच्या घरची बाई शेतमजुरी करायला दुसऱ्याच्या वावरात मजुरीला जाते .तुटपुंज्या धंद्याच्या मुला बाळांना शिकवलं नाही.. काय ते सात वर्ग शिकले आणि पोटा पाण्यासाठी हातात इरा (विळा) द्या लागला. त्याचे नातू मात्र शिकवणार त्यांना जितक शिकायच ते, असं ते सांगतात.

ढोर: गावात ढोर जातीची लोक नसले तरी ते काम मुसलमानातील कसाब ढोर कापतात.त्यांचा बैलांचा धंदा आहे कसाब कासार पिंजारी यांची पूर्वी तीनच घरी होती .आता त्या तीन घराची अनेक घरे झाली आहेत. ढोराचा धंदा आहे. कसाब हा ढोराचा व्यवसाय करतो, तर कासार हा गावात बांगड्या चा व्यवसाय करतो, आणि पिंजारी हा गादाधुलया बनवण्याचं काम करतो. आज ह्या लोकांच्या तीन वस्त्या आहेत कसाबपुरा, मेहंदीपुरा आणि आबाद वस्ती .यांनी व्यवसायाच्या जोरावर शेती शेती घेऊन शेती करतात. ढोराचा व्यवसाय करणारे आज श्रीमंत वर्गात मोडतात, पण यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. मुलींची लवकर लग्न केली जातात. शुद्धीकरणाचा किंवा दूध पाळण्याचे तत्व इथेही पाळलं जातं.

**गाव कुसाच्या आतील बलुतेदार:**

गावकुसाच्या आतील बलुतेदारांमध्ये देखील उतरंड होती. त्यापैकी शेतकऱ्यांच्या जास्त उपयोगी पडणारे बलुतेदार पहिल्या ओळीतले मानले जात. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे होते सुतार. याच्याशिवाय शेतकऱ्याचे चालत नसे. सुतार समाज बहुतेक गावात असतोच .त्याचे आजच्या गावगाड्यात काय चालले ते पाहू.(उल्का महाजन)

सुतार: बारा बलुतेदारांमधील उत्पादक जातींपैकी एक जात म्हणजे सुतार. शेतकऱ्यांचे सुताराशिवाय जमत नसे.कारण शेतीची शेतीची महत्त्वाची अवजारे सुतार बनवत असत. आत्रे 'गावगाडा'मध्ये लिहितात ,सुतारकामासाठी सुताराला कुणब्यांना सुताराला लाकूड पुरवावे लागते आणि त्याच्या हाताखाली गळी द्यावा लागतो. मजुरी न घेता बलूत्यात खाली लिहिलेली कुणबीकीची व कारभावाची कामे तो करतो. नांगर, हाळस,मोघड, फराट,वावडी, पाभर ,कुळव ,कोळपे ,जु, वडवान, मोटेचे सुळे, दुबे , फावडी , मेखा , दांडे, खूंटे मुठी वगैरे. नागर दोन-तीन वर्षे व पाभर,तिफन चार-पाच वर्षे टिकतात, बाकीची ओतकाठीची डागडुजी नेहमी करावी लागते. नवीन मोघड करतात, त्या सालाला सुताराला चार शेर व एरवी अच्छेद ते तीन शेर बी कुणबी देतात आणि राजमाथ्याला शेकडा दोन प्रमाणे बलुते देतात. हे प्रमाण गावोगाव ठरलेले असे. ज्या गावातले सुतार काही कारणांनी बाहेर गेले, तिथे इतर गावातून सुतार आणून गावाने बसवले आहेत . क्वचित ठिकाणी अन्य जातीही हा व्यवसाय उचललेला दिसतो.
वाड्याचे म्हणजेच सुताराचे चार पाच घर आहेत. पहिली पीढ़ी ही मूळ बलुतेदारी करायची. त्यांना गावात दुसऱ्या शिवेतून सुतार कामासाठी चिटणीसांच्या काळात आणल गेले. आता सध्या यागावात सुतार समाजाचे मोजून चार पाच घर होते. त्यातील प्रपंच वाढून आज वीसेक घर आहेत. पिढीमध्ये आरा मशीन आणि फर्निचरची व्यवसाय करू लागली.

लोहार: बलुत्यातील शेतकऱ्यांसाठी गरजेची दुसरी जात म्हणजे लोहार . हे काम आवश्यक असले तरी प्रत्येक गावात एक लोहार सापडत नाही . पंचक्रोशीत एखादा लोहार मिळतो. एखाद्या गावात लोहाराची वस्ती असलीच तर चार-पाच घरापेक्षा जास्त एका ठिकाणी आढळत नाही. बहुदा ते फिरते राहून काम करताना आढळतात . घिसाडी ,गाडीलोहार या त्यांच्या पोटजाती असल्याचे सांगतात.
लोहाराला लोखंड, सरपण, कोळसे, गोवऱ्या व हाताखाली गडी देऊन काम करून घेण्याची पद्धत होती. काम तो स्वतःच्या घरी भट्टीवर करीत असे. बलुत्यात चालणारी त्याची कामे होती. नांगराचा फाळ व वसू ,पाभरीचे फारोळे, कोळप्याच्या गोल्या मोटेचे कडे, कण्याच्या आऱ्या, कुदळ,लहान कुऱ्हाड, खुरपे, विळा ,उलथने, विळी, जात्याचे खुटे, सुताराचे साहित्य ,सोनाराची ऐरण, सांडस, चिमटे, हातोडे ,चांभाराच्या आऱ्या, राप्या, कुंभाराची कुदळ, खोरे , खुरपे मुलाण्याच्या सुर्या, इत्यादी. त्या बदल्यात त्यांना दीड शेर बी व शेकडा पावणेदोन याप्रमाणे बलुते कुनबा कडून मिळत असे.
गावातलं तीन घर लोहाराच होते. एक ह्या गावातील स्थायी तर दोन घरे ही दुष्काळ काळात दुसऱ्या गावातून आली. पूर्वी पासून एकच घर लोहाराच लोहाराची तीन घर होते दुसरी पिढी आणि दुसरी पिढी वर्कशॉप चालवते

कुंभार: गावगाड्यातले कुंभार हे आणखी एक बलुतेदार. पूर्वी ते घागरी, दुधानी,ताकाच्या डेरा, सुगडे, वेळण्या, पथ्या, चिटकी वगैरे बलुत्यात देत व त्या बदल्यात कुणबी त्यांना शेर,अच्छेद बी व शेकडा सव्वा बलुते देत ,असे अत्रे यांनी त्यांच्या गावगाडा'मध्ये नोंद आहे. राजन, कोथळी या मोठ्या जिनसा ते रोखीने विकत .कुंभाराचे बलुतेदेखील पहिल्या ओळीतले म्हणजे शेतकऱ्याला त्याची गरज जास्त लागे. बदलत्या गावगाड्यात कुंभाराच्या धंद्यावर परिणाम होणे अपरिहार्य होते .

पहिली पिढी, दुसरी पिढी आणि तिसरी पिढी तिने पिढ्यापासून मडके बनवण्याचे व्यवसाय पारंपरिक पद्धतीने सुरू आहे. विटा भट्टी आणि शिकलेले पण आहेत . गावातील ह्याचे एकूण आठ घरे आहेत. त्याच्याकडे काही प्रमाणात शेती आहे. पण शेती ही खूप पीक देत नाही. त्यामुळे त्याचा पारंपरिक व्यावसाय ते करून त्यातूनच त्यांना चांगल उत्पन्न मिळते. कुंभार असणारे मनोहर पूनासे सांगतात.
न्हावी: न्हाव्याचे बलुते हे दरडोई ठरलेले होते. आत्रे नोंदवतात त्याप्रमाणे, न्हाव्याला लहानथोर दर डोकीमागे दोन ते चार पायल्या बलुते आणि हजामतीच्या दिवशी एक भाकर मिळे. कुणब्यांची हजामात महिन्यात तीनवार होई. त्यावेळी खेड्यात हजामतीला पाव आणा किंवा अर्धा आणा पडे. विशेष प्रसंगी. न्हाव्याला बोलवण्यास खण , शिधा, ओटी वा कधी रोकड दिली जाई. काही ठिकाणी न्हाव्याचे बलुते शेकडा पावणे दोन होते. खेडेगावात अजूनही अपृश्यता पाळली जाते की नाही, हे तपासण्याची एक कसोटी म्हणजे न्हावी सर्व जातीचे केस कापतो की नाही हे पाहणे. कारण मागास समजल्या गेलेल्या जातीतील व्यक्तींचे केस न कापणे हे रुढी अगदी पंधरा ते वीस वर्षांपर्यंत चालू होती . आता त्यात बदल घडला आहे का हे तपासण्याचा प्रयत्न केला.
चार घर प्रथापिताचे.. दोन घर इकडे महारांचे दोन न्हावी महार होते.पण आता ते नागपूर सारख्या ठिकाणी प्रस्थापित मोठे सलून टाकले.
गुरव: बोलू त्यात गुरवांचे काम होते देवपूजा देवळाची झाडलोट व दिवाबत्ती करणे सणाच्या दिवशी पत्रावळी पुरविणे इत्यादी काम आजही चालू आहे.
परीट: गावगाड्यांमध्ये परिटाचे पारंपारिक काम होते लग्नकार्य, सोयर ,सुतक वगैरे प्रसंगी गावकऱ्याचे कपडे धुणे. तसेच लग्नकार्यात पायघड्या घालणे, गावातील सधन व मराठ्यांच्या घरी कपडे धुणे. त्याबद्दल त्याला रोज भाकरी मिळत असे . परटाला शेर अच्छेर बी आणि न्हाव्याच्या तिसरा हिस्सा बलुते मिळे.
गावामध्ये तीन घर धोबी.. दुसरी पिढी शिकले.. पाल हॉटेल व्यवसाय.. प्रेस चे दुकान आहे
कोळी: कोळी समाजाचे गावगाड्यातले काम होते पाणी भरण्याचे, क्वचित पाट साफ ठेवण्याचे. त्यासाठी त्यांना शेकडा एक बलुते मिळे.
गावामध्ये कोळी समाज असला तरी त्यांनी मच्छिमार हा व्यवसाय कधीच केला नाही.. झिंगा आज्जी सांगते की, आमच्या कुठल्याच पिढीने मच्छिमारांच्या व्यवसाय केला नाही. गावाच्या शिवेला टाकळी ह्या गावाजवळ वर्धा नदी वाहते तर अलमडोह इथून यशोधरा नदी आहे . आपल्या ह्या संपूर्ण गावात एकच भोई आहे.. तो ही अलमडोहचा तिथे नदी असल्याने तोच एक हा व्यवसाय करतो. आमच्या दोन तीन पिढ्या पासून जे काही गावातले चार-पाच घर आहे ते मुरमुरे फुटण्याचा धंदा आहे. गावोगावी जाऊन बाजार करायचा. त्यांच्या कुठल्याच पिढीने मच्छीचा धंदा नाही केला. ह्याच व्यवसायावर त्याची घरे चालतात..,आता त्याचे नातवंड हा व्यवसाय करणार नाही. ते शिकू लागले तर काही नौकरी पाणी करतील. ह्या धंद्यात फक्त पोट भरते. शिल्लक काही राहत नाही. पोटासाठी हा धंदा करने आहे. अश्या त्या सांगत.

सोनार: सोनार बलुत्यात असले तरी बहुतेक डाग घडवण्याचे काम ते रोखीने करत असत. फक्त कान टोचणे, कधी पाटील, कुलकर्ण्याची गाडी धरणे ,प्रसंगी लोक बोलावणे ,ही जागलकीची कामे ते करत असत .सोनाराला महार जागल्याच्या दहावा हिस्सा बलुते मिळे.
आत्रे नोंदवतात, पूर्वी टाकसाळी नव्हत्या सबब खरे-खोटे नाणे ओळखणे जड जाई खोटे म्हणून जर तहसील इथून नाणे परत आले तर कोणाच्या माती मारावे याचा पाटलाला मोठा बुचकळा पडे या गोष्टी लक्षात घेऊन गावाने नाणे पारखण्याला आणि त्याच्या खरीपणाबद्दल जिम्मा घेण्याला सोनार उभा केला आणि त्याच्या हुद्द्याचे नाव पोद्दार ठेवले सोनारामध्ये पोद्दार ही मानाची पदवी आहे.
सोनार असणारे जुमडे सांगतात की,
"पूर्वी पासून गावात एकच सोनाराच् घर होतं असे गावातील सर्वच वयस्कर म्हातारे व्यक्ति सांगतात.बाराही शिवेच्या गावातील लोक त्या सोनाराकडे नाक कान टाचण्या करिता व दागिने घडविण्यासाठी व खरेदी करण्यासाठी यायचे आणि आजही येतात." स्वत: सोनार असणारे जुमडे सांगतात की, त्याच्या सर्वच पिढ्यांनी हाच व्यवसाय केला आणि सोना-चांदीचा हा व्यवसाय करणारी त्याची चौथी पीढ़ी आहे. आता त्याचे मूल देखील हाच व्यवसाय पुढे चालू ठेवणार.. या व्यवसायात पैसा आणि प्रतिष्ठा दोन्ही आहे. त्याच्या मुलाच ही अर्थातच पाचवी पिढीच सोन्याचे मोठे व्यापारी झाले. त्याच मोठ दुकान आहे. दागिने घडविने ते विकने हे काम केलं जातं. त्याच्याकडे त्यांना मिळालेली जमीन आहे. तसेच त्याच्या आजोबानी घेतलेली शेती आहे. त्या शेतीच्या कामाकरिता गडी माणूस ठेवला आहे. तोच गडी माणूस शेतीचे सर्व काम बघतो. सोन्याचा पारंपरिक व्यवसाय स्वत: सोनार असणारे त्याच मूलं बघतात आज त्याच मोठ सोन्याच दुकान आहे. अर्थातच सोनाराचा पारंपरिक व्यवसाय हा मोठा प्रस्थापित मानला गेला आहे.

गावामध्ये श्रीमंत व व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात असल्याने, आज गावामध्ये चार सोन्याची दुकाने आहे. शहरातून आलेल्या व्यापारी वर्गाचे ते दुकान थाटले आहे, मोठा व्यापारही त्याच माध्यमांतून केला जातो. ह्या व्यवसायाला प्रस्थापित मानला गेला. कौशल्या आधारित असणारा हा व्यवसाय प्रस्थापितांच्या वर्गवारीत मोडला गेला .बारा बलुतेदारातील प्रस्थापित कौशल्याधारित व्यवसाय म्हणून मान्यता पावला.

ब्राम्हण : "ब्राह्मण हे बलुतेदारही होते आणि जमीनदार- वतनदार व शेतकरीही होते .गाव -गाड्यात त्याची भूमिका दुहेरी आहे .ग्रामजोशी म्हणजे त्यातील भिक्षुकी करणारे हे बलुत्यात होते, पण गावची देशमुखी आणि कुलकर्णीपद म्हणजे गावदप्तर सांभाळण्याची जबाबदारी ब्राह्मणांची होती .हे सरकारी वतन होते ."
गावागावात ब्राह्मणाची घरे आता मोजकीच राहिली आहेत बदलत्या काळाचा वेध घेऊन सर्वप्रथम ब्राह्मण शहरात स्थलांतरित झाले . त्यांच्याकडे शिक्षण असल्याने शहरात नोकऱ्या मिळणे त्यांच्यासाठी सोपे होते. देशमुखी, वतनदारी असलेल्या ब्राह्मणाच्या जमिनी कुळ कायद्यात गेल्या ,जमीनधारणा कमी झाली ;पण हे भिक्षुकी करत होते अथवा गावातील देवाचा मान ज्या कुटुंबाकडे होता, ती कुटुंबे गावात टिकून राहिली.
ब्राह्मणामध्येही एकसंधता नाही. त्यात वतनदार आणि निव्वळ भिक्षुकी करणारे त्यांच्या आर्थिक थरात आणि सामाजिक दर्जात फरक होता. त्यातील ग्रामजोशी हे बलुत्याचा भाग होते, पण इतर वतनदार हे मोठे जमीनदार आणि गावची सत्ता हातात असलेले होते.
बदलत्या परिस्थितीचा वेध घेऊन गावाबाहेर स्वेच्छेने पडले ते ब्राह्मण. शिक्षणाचा फायदा घेऊन त्यांनी नोकऱ्या मिळवल्या, उद्योगधंदा सुरू केला .जमीन सुधारणा कायद्यामुळे त्यांच्याकडील जमिनीचे प्रमाण कमी झाले ,पण आधुनिक आणि उच्च शिक्षण घेतल्याने नोकऱ्यांमध्ये देखील त्यांचा प्रभाव राहिला. त्यांचा सामाजिक दर्जा वरचा होता.
गावामध्ये ब्राह्मणांचे सात घर होते, गर्वशी म्हणतील प्रस्थापित. आता सध्या गावामध्ये चार ब्राह्मणांचे घर आहेत पहिल्या पिढीपासून शिकले. ब्राह्मण बलुतेदारी होते आणि जमीनदारही. वतनदार व शेतकरी होते. गावामध्ये त्यांच्याचकडे चिक्कार जमिनी होत्या..काही जमीन धारणा कायद्यामुळे सरकारच्या ताब्यात आहे. आता देखील जमिनी शिल्लक आहेत. त्यांनी गाव सोडले असले तरी देखील त्याच्या जमिनी आहेत. काही जमिनी गावातील मोठे शेतकरी व राजकारणी यांनी घेतल्या. परंतु त्याचे वाडे आज ही गावात पडीत स्वरूपात खंडर पडून आहेत.
खरं तर कधी काळी प्रस्थापित असणारे ब्राम्हण ह्याचं गावात असलेल अस्तित्व केवळ त्याचे पडित त्याच्या असलेल्या जमिनी ज्या पडीत आहे व त्याचे बाजार लाईनीत असणारे वाडे जी जीर्ण अवस्थेत दिसतात तेवढच त्याच काय ते गावात आहे.
आतापर्यंत नोंदलेल्या जातीय 12 बलुतेदारापैकी होत्या ब्राह्मण ग्राम जोशी आणि गुरव या देवाचे व धार्मिक विधी करणाऱ्या जाती ओळखता इतर जाती उत्पादक किंवा प्रत्यक्ष सेवा पुरविणाऱ्या जाती आहेत त्याचे उत्पादन काम शेतकऱ्यांसाठी व शेतीसाठी आवश्यक होते शेती हा गावगाडाचा कणा होता त्यामुळे त्याचे बलुते गावगाड्यात ठरलेले होते यांच्याशिवाय शेतकऱ्यांची लढत असे हे गावातील मानकरीही होते त्यांचा गावाच्या सामूहिक आणि धार्मिक कार्यक्रमात त्याला वाटा व जबाबदारी ठरलेली होती.

ह्या अत्रे ने सागितलेल्या गावगाडा तपासायचे म्हटले तर काही अंशी खरे दिसून आले .कारण दोन शतकाचा कालखंड लोटून गेला आहे त्याच्या ह्या निरीक्षणाला .
' गाव- गाडा' या पुस्तकातून आत्रे सांगू पाहतात की, गाव- गाडा म्हणजे बलुतेदारी व्यवस्था . ही समज खोटी नाही. बलुतेदारी व्यवस्था ही गाव- गाड्यातली मूलभूत व्यवस्था होती. तिच्या आधारेच गाव- गाड्या चालायचा. पण गाव-गाडा म्हणजे फक्त तेवढेच नव्हते. निव्वळ बलुदारी व्यवस्था असती तर ती फक्त वस्तू आणि सेवा याच्यात देवाण- घेवाणी पुरती मर्यादित राहिली असती . गाव- गाडा ही एक अतिशय गुंतागुंतीची व्यवस्थाहोती.खेडी म्हणजे गाव हे तिचे भौगोलिक क्षेत्र होते तर शेती अर्थव्यवस्था हा तिचा कणा होता. या गावांमध्ये जी कुटुंब राहत होती ती निरनिराळे व्यवसाय करीत, मात्र ते करण्याचा पाया जात व्यवस्था होता.
जातव्यवस्थेमध्ये व्यवसाय वंशपरंपरागत होते आणि जात, कुटुंब आणि व्यवसाय याची एक घट्ट सांगड घातलेली होती. शिवाय जातव्यवस्थेला एक प्रकारचे धार्मिक अधिष्ठान होते आणि जातीशी निगडित रुढी - परंपराच्या माध्यमातून धर्म माणसाच्या जीवनाचे नियंत्रण करीत होता.
अलका महाजन म्हणतात की , "हा ढाचा मोठ्या प्रमाणात पिढ्यानपिढ्या टिकून राहण्याचे कारण त्यांना बांधून ठेवणारे सांस्कृतिक व धार्मिक बंधन होय .गावातल्या देवस्थानाशी जोडलेले पारंपारिक मान आणि त्यांची धार्मिक व्यवस्था ही त्या आधारावर होती . आजही व्यवसाया आधारित गावगाडा कोसळला असला तरी अनेक गावात त्याची देवस्थानाशी जोडलेली आखणी आणि मानकऱ्याची व्यवस्था बऱ्यापैकी टिकून आहे.

**निष्कर्ष:**

आजही पिढ्यान् पिढ्या रुजवलेला विचार मात्र लोकशाहीच्या पंच्याहत्तरी नंतरही काही अंशी का होई ना त्याचे प्रमाण कायम आहे; कारण विश्वास ठेवा ,वाद घालू नका , चिकित्सा करू नका हे रुजवणाऱ्या रूढी - परंपरा आजही अनेक रूपात कायम आहेत. भारतीय संस्कृतीत व्यक्तीपेक्षा समूहाला अधिक श्रेष्ठत्व दिलेले. असल्यामुळे. प्रत्येक व्यक्तीचे दुसऱ्याप्रती काही कर्तव्य आहे या विचाराभोवती नियमने होती. जातीसंस्थेची उद्दिष्टे यासाठी पूरकच होती. परंतु त्यामुळे व्यक्तींचा विकास खुंटला. जातीय उतरंडस अशी होती की वरिष्ठ जातींयाना अधिकाऱ्यामुळे सत्ता संपत्ती आणि प्रतिष्ठा होती व त्या

जोरावर ते खालच्या थरातील बहुसंख्य जाती- उपजाती जमाती आणि भटक्या जमाती यांच्यावर निर्बंध लादू शकले. त्या निर्बंधानुसार त्यांनी भीती अज्ञान आणि दारिद्य यामधून आलेल्या न्यूनत्वामुळे महत्त्व मुळे दिसत होती.

**संदर्भ ग्रंथसूची**

□ अत्रे , त्र्यंबक. गावगाड़ा 1915,आर्यभूषण पुणे .
□पाटील,अनिल 2012. गावगाडा शतकानंतर ,मनोविकास प्रकाशन पुणे
□महाजन, उल्का. कोसळता गावगाडा :2015,शब्द पब्लिकेशन्स बोरिवली
□पवार, जयसिंगराव 2012 राजश्री शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे
□Robertson, Alexander 1938,The mahar folk;A study of untouchables in maharashtra . Originally Published